मंत्रालयीन सेवा
जनहितार्थ सर्वदा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
ग्राम विकास विभाग
३ रा मजला, बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मंत्रालय, मुंबई -४०० ००१.
दूरध्वनी क्रमांक : (०२२) २२०६०१४४

**Website** : https://rdd.maharashtra.gov.in **Email** : soest3a.rdd-mh@nic.in

---

<u>ई-मेलद्वारे</u>

क्रमांक : RDD-14011/72/2026-RDD(Est-3A) दिनांक : २४ सप्टेंबर, २०२६.

प्रति,

विभागीय आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय,
सर्व विभाग.

**विषय :** एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी)- ११ व तद्नंतरच्या तुकड्यांमधील परिविक्षाधीन गट विकास अधिकारी व सहायक गट विकास अधिकारी यांच्या परिविक्षाधीन कालावधीतील रजा मंजुरीबाबत...

**संदर्भ :** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः टीआरएन-०४२४/ प्र.क्र.३७/प्रशि-१, दिनांक १ ऑगस्ट, २०२५.
२) शासन शुद्धीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः टीआरएन-०४२४/ प्र.क्र.३७/प्रशि-१, दिनांक १२ सप्टेंबर, २०२५.
३) अधिसूचना, वित्त विभाग क्र.मनासे-२०२०/प्र.क्र.०४/सेवा-६, दिनांक २८ जानेवारी, २०२५

**महोदय,**

सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त संदर्भ क्र.१ व २ येथील अनुक्रमे दिनांक १ ऑगस्ट, २०२५ व दिनांक १२ सप्टेंबर, २०२५ रोजींच्या शासन निर्णयांन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा परीक्षेद्वारे शासन सेवेत गट-अ व गट-ब मध्ये नियुक्त होणाऱ्या परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाच्या आराखड्यात सुधारणा करण्यात आली असून सदर आराखडा सीपीटीपी-११ व तद्नंतरच्या तुकड्यांना लागू करण्यात आला आहे.

०२. वित्त विभागाच्या महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मध्ये दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजीच्या अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) (सुधारणा) नियम, २०२५ अन्वये सुधारणा करण्यात आलेली आहे. सदर नियमातील नियम २७ मध्ये एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांना संपूर्ण परिवीक्षा व प्रशिक्षण कालावधीत रजा मंजूरीबाबत तरतूद करण्यात आली आहे.

०३. एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी)- ११ व तद्नंतरच्या

तुकड्यांमधील परिविक्षाधीन गट विकास अधिकारी, गट-अ व परिविक्षाधीन सहायक गट विकास अधिकारी, गट-ब यांच्या परिवीक्षा व प्रशिक्षण कालावधीतील रजा मंजूर करण्याचे अधिकार संबंधित विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहेत.

०४. संबंधित विभागीय आयुक्त यांनी उपरोक्त संदर्भ क्रमांक ०३ येथील वित्त विभागाच्या महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) (सुधारणा) नियम, २०२५ च्या नियम २७ मधील तरतूदी विचारात घेऊन, प्रशिक्षणार्थी अधिकारी यांच्या परिवीक्षा व प्रशिक्षण कालावधीतील रजा मंजुरीबाबत कार्यवाही करावी.

आपला,

(सुनिल पांढरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
३. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे.
४. संचालक, वनामती, धरमपेठ अमरावती रोड, नागपूर.
५. अपर आयुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व विभाग.
६. उप सचिव (प्रशि-१), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवड नस्ती, कार्यासन आस्था-३ अ, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.